महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- मआ/२आप्रवि/१३४३
दिनांक :- ०४/०६/२०२०

# आदेश

विषय:- पुणे महानगरपालिकेतील वर्ग १ ते ३ मधील मनपा अधिकारी/कर्मचा-यांनी त्यांचे मालमत्ता व दायित्वाबाबतचे विवरणपत्र सादर करणे बाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक २/६/२०१४

२) महापालिका आयुक्त कार्यालयाकडील कार्यालयीन आदेश जा.क्र. मआ/उआ(ज)/६९० दिनांक ८/१०/२०१४

३) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय वशिअ-११२०/प्र.क्र.२७/११, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक ११/५/२०२०

संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयास अनुसरून संदर्भ क्र. २ च्या कार्यालयीन आदेशान्वये वर्ग १ ते ३ मधील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे मालमत्ता व दायित्वाबाबतचे विवरण पत्र विहित नमुन्यात सादर करणेबाबत आदेशित करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये मत्ता व दायीत्वे यांची वार्षिक विवरणे सादर करणेबाबत मुदतवाढ देण्यासंबंधी आदेश निर्गत करण्यात आले आहे. सध्या राज्यामध्ये कोरोना (COVID १९) विषाणू संसर्गाने पसरला आहे. या विषाणूचा आणखी प्रसार रोखण्यासाठी राज्यामध्ये लॉकडाऊनही घोषित करण्यात आले आहे. या विषाणूचा प्रसार शासकीय कार्यालयामध्ये होऊ नये आणि अधिकारी / कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये यासाठी कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन उपस्थितीवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत.

सदर परिस्थिती विचारात घेऊन संदर्भ क्र.३ च्या आदेशान्वये दर वर्षाशी मत्ता व दयीत्वाची नियतकालिक विवरणे सादर करण्यासाठी विहित केलेली दिनांक ३१ मे पर्यंतची कालमर्यादा या वर्षापुरता एक विशेष बाब म्हणून शिथिल करण्यात येत असून दिनांक ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत सादर करावे असे या आदेशान्वये कळविण्यात येत आहे.

तसेच सेवेत प्रथम नियुक्ती झालेले अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवेत पहिल्या दोन महिन्यांचा कालावधी हा राज्यातील लॉकडाऊन सुरु झाल्यानंतर पूर्ण होत असल्यास त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या वेळेच्या स्थितीस अनुसरून मत्ता व दायित्वाचे पहिले विवरण विहित कालावधीत सादर करू शकले नाहीत वा शकत नाहीत अशी प्रकरणे असल्यास, अशा अधिकारी /

कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या वेळेच्या स्थितीस अनुसरून द्यावयाच्या मत्ता व दायीत्वाचे विवरण दिनांक ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत सादर करावे.

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत ,
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/वि/ई)
यांजकडे माहितीसाठी...

प्रति,
सर्व खातेप्रमुख
सर्व उप आयुक्त (परिमंडळ विभाग क्र. १ ते ४)
सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त (क्षेत्रिय कार्यालय क्र.१ ते १५)
पुणे महानगरपालिका
यांजकडे पुधिल आवश्यक कार्यवाहीसाठी....